# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## ५ब फेरीचे प्रसिध्दी निवेदन

दि.०५.०८.२०१६.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे इयत्ता ११वी चे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने होत आहेत. या प्रवेश प्रक्रियेत ७३,३८५ जागांसाठी ७३,९६१ अर्ज प्राप्त झाले होते.

सुधारित वेळापत्रकानुसार गट-५अ फेरीतील प्रवेश पूर्ण झालेले आहेत. वेळापत्रकानुसार गट-५ब ची गुणवत्ता यादी सोमवार दि. ०८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रसिध्द होणार होती. त्याऐवजी उद्या शनिवार दि.०६ ऑगस्ट २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रसिध्द करण्यात येणार आहे. या यादीतील प्रवेश मात्र वेळापत्रकानुसार सोमवार दि.०८ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत, व दि. ९ ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते ३.०० वाजेपर्यंतच विद्यार्थ्यांनी घ्यावेत.

<u>पाचवी फेरी</u>

५ब) अद्याप ऑनलाईन अर्ज न केलेले, अपुर्ण अर्ज असलेले अशा गटातील विद्यार्थ्यांनी दि. ३० जुलै २०१६ रोजी वेबसाईटवर प्रसिध्द होणा-या रिक्त जागांचा तपशिल पाहून पसंतीक्रम दि. १ व २ ऑगस्ट २०१६ रोजी रात्री ११.०० वाजेपर्यंत अर्ज भरलेले आहेत. या विद्यार्थ्यांना गट-५अ फेरीतील ११,८९४ विद्यार्थ्यांना ॲलोकेशन केल्यानंतर उर्वरित १४,४५४ या रिक्त जागांवर पुढील प्रमाणे ॲलोकेशन देण्यात आले आहेत.

| अ.क्र. | शाखा | गट-५ब फेरीसाठी रिक्त जागा | नव्याने समाविष्ट विद्यार्थी गट- ५ब प्राप्त अर्ज | गट-५ब फेरीसाठी प्रवेश दिलेले |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कला (मराठी) | ३५२७ | ४५६ | ४४३ |
| २ | कला (इंग्रजी) | २७५८ | ५३ | ५३ |
| ३ | कॉमर्स(मराठी) | १५२३ | ५८८ | ५०९ |
| ४ | कॉमर्स (इंग्रजी) | २७८७ | ४१७ | २६६ |
| ५ | विज्ञान(इंग्रजी) | ३८५९ | ४९७ | ३१९ |
| | एकुण | १४४५४ | २०११ | १५९० |

पाचव्या फेरीच्या गट- ५ब मधील ॲलोकेशन झालेल्या १५९० विद्यार्थ्यांपैकी पहिल्या पसंतीक्रमाचे ९०४ व दुस-या पसंतीक्रमाचे २०९ विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालये मिळालेले आहेत.

<u>५ब गटातील विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रक पुढील प्रमाणे राहील.</u>

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | पाचवी फेरी गट-५ब मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करणे. | शनिवार दि. ६ ऑगस्ट २०१६ दुपारी ३.०० वा. |
| २ | पाचवी फेरी गट-५ब मधील विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | सोमवार, दि. ८ ऑगस्ट २०१६ ,स. ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत<br>मंगळवार, दि. ९ ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते ३.०० वाजेपर्यंत |

## : पाचव्या फेरीतील ५ब गटातील विद्यार्थ्यांसाठी सूचना :-

१) पाचव्या फेरीच्या गट-५ब या गटातील विद्यार्थी हे नव्याने अर्ज करणारे व अपूर्ण अर्ज पूर्ण करणारे असल्याने त्यांना पहिल्यांदाच ऑनलाईन प्रवेश देण्यात येत आहे. इ. ११ वी प्रवेश प्रक्रियेच्या http://pune.fyjc.org.in या संकेतस्थळावर आपला ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक टाकून कोणते कॉलेज मिळाले आहे हे पाहावे.

२) पाचव्या फेरीच्या ५अ गटामधील विद्यार्थ्यांना ॲलोकेशन झाल्यानंतर दि. ०४ ऑगस्ट २०१६ रोजीच्या १४४५४ रिक्त जागांवर गट-५ब मधील विद्यार्थ्यांचा ॲलोकेशनसाठी विचार केला आहे.

३) गट-५ब मधील विद्यार्थ्यांनी मिळालेल्या कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे महाविद्यालयात सादर करुन दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चित करावा. (दि. ०८ ऑगस्ट २०१६ , सकाळी ११ ते ५.०० वाजेपर्यंत, दि. ०९ ऑगस्ट २०१६ , सकाळी १० ते ३.०० वाजेपर्यंत). (कोणत्याही परिस्थितीत वेळ वाढवुन दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.)

## विशेष फेरी-१ चे वेळापत्रक

१) पाचव्या फेरीनंतरच्या विशेष फेरीचे वेळापत्रक प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर जाहीर केलेले आहे. त्यानुसार

अ) दि. १० ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता विशेष फेरीसाठी रिक्त जागा जाहिर केल्या जातील.

ब) विशेष फेरी-१ मध्ये रिक्त जागांवर पाचव्या फेरीतील गट-५अ, ५ब मधील ॲलोकेशन न झालेले विद्यार्थी व ज्या विद्यार्थ्यांना उपलब्ध रिक्त जागांवर प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांनी त्यांच्या पुर्वीच्याच ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांकाचा वापर करुन प्रवेश अर्जातील पसंतीक्रम (भाग-२) पुन्हा भरणे आवश्यक आहे. किमान ५ व कमाल १५ कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम दिनांक १० ऑगस्ट २०१६ सकाळी १०.०० पासून ते दि. ११ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १०.०० वाजेपर्यंत भरावेत. विशेष फेरी-१ मध्ये पुन्हा नव्याने पसंतीक्रम भरणे आवश्यक राहील, जे विद्यार्थी पुन्हा भाग-२ भरतील असेच विद्यार्थी विशेष फेरी-१ मध्ये प्रवेशासाठी पात्र ठरतील. जे विद्यार्थी विशेष फेरी-१ साठी पुन्हा नव्याने पसंतीक्रम भरणार नाहीत (रिक्त जागा पाहुन) अशा विद्यार्थ्यांचा प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

क) ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज केलेला नाही, तसेच यापुर्वी अपूर्ण असलेला अर्ज अद्यापही पुर्ण केलेला नाही अशा विद्यार्थ्यांनी विशेष फेरी-१ साठी पुढील केंद्रावर नवीन अर्ज भरण्यासाठी माहिती पुस्तिका घ्यावी, व माहिती पुस्तिकेतील सुचनांप्रमाणे भाग-१ पुर्ण करुन त्याचे ॲप्रुव्हल त्याच केंद्रावर करुन घ्यावे. तसेच

ज्या विद्यार्थ्यांचा अर्ज अद्यापही अपुर्ण आहे त्यांनीही भाग-१ ॲप्रुव्हल घेवुन दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांनी भाग-१ व भाग-२ वरील वेळापत्रकाप्रमाणे पुर्ण करावेत.

माहिती पुस्तिका मिळण्याचे व भाग-१ ॲप्रुव्हल करुन घेण्यासाठी केंद्र

१) एच.एस.सी.पी (हूजुरपागा) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आप्पा बळवंत चौक, लक्ष्मी रोड पुणे

ड) विशेष फेरीतील प्रवेश हे उपलब्ध रिक्त जागांसाठी आलेल्या अर्जातुन गुणवत्तेनुसार, संवर्गनिहाय दिले जाणार आहेत.

विशेष फेरी-१ चे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | विशेष फेरी-१ | |
| | १. रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे. | दि.१० ऑगस्ट २०१६ स. १०.०० वाजता |
| | २. पसंतीक्रम (भाग-२) पुन्हा भरणे. | दि.१० ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते दि. ११ ऑगस्ट सकाळी १०.०० वाजेपर्यंत |
| | ३. गुणवत्ता यादी जाहीर करणे. | दि.१२ ऑगस्ट २०१६ दु.२.०० वा. |
| | ४. गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश | दि. १२ ऑगस्ट २०१६ दु.२.०० ते ५.०० वाजेपर्यंत<br>दि.१३ ऑगस्ट २०१६ स. १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत |

सदरचे प्रसिध्दी पत्रक इ. ११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळावर व शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे या कार्यालयाच्या **www.dydepune.com** या संकेतस्थळवर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१